# प्रेसनोट

दि.२३/०५/२०२५

| | |
|---|---|
| लाचलुचपत प्रतिबंधक विभाग/घटक | नाशिक/अहिल्यानगर |
| गुन्हा नोंद क्रमांक | भिंगार कॅम्प पो.स्टे., जि.अहिल्यानगर गु.र.नं.३२३/२०२५ |
| कलम | भ्रष्टाचार प्रतिबंध अधिनियम सन १९८८ चे कलम ७ |
| आरोपीचे नांव व कार्यालय | भाऊसाहेब गोविंद काळे, सहाय्यक पोलीस उप निरीक्षक, वर्ग–३, नेमणुक एम.आय.डी.सी. पो.स्टे., जि.अहिल्यानगर. |
| मागणी केलेल्या लाचेची रक्कम | ७०,०००/– रूपये |
| स्विकारलेली लाचेची रक्कम | ---- |
| थोडक्यात माहिती | प्रस्तुत बातमीतील हकीगत अशी की, तोफखाना पोलीस स्टेशन कडील गु.र.नं. ५६९/२०२४ भा.दं.वि.क.३९४, ३४ या गुन्हयामध्ये तक्रारदार यांच्या भावाला चोरीचे सोने विकत घेतले या कारणावरुन आरोपी न करण्यासाठी आरोपी लोकसेवक भाऊसाहेब गोविंद काळे, सहाय्यक पोलीस उप निरीक्षक यांनी तक्रारदार यांचेकडे ७०,०००/– रुपये लाचेची मागणी केली त्या संदर्भात तक्रारदार यांनी ला.प्र.वि. कार्यालय, अहिल्यानगर येथे तक्रार दिली होती. सदर लाच मागणी तक्रारीच्या अनुषंगाने दि.०९/०५/२०२४ रोजी लाच मागणी पडताळणी करण्यात आली. लाच मागणी पडताळणी दरम्यान आरोपी लोकसेवक भाऊसाहेब गोविंद काळे, सहाय्यक पोलीस उप निरीक्षक यांनी पंचा समक्ष तक्रारदार यांचेकडे त्यांच्या भावाला गुन्हयात अटक होऊ नये म्हणून सदर गुन्हयातील तपासी अधिकारी यांच्या नावाच्या प्रभावाचा बेकायदेशीर वापर करुन फिर्यादी यांच्याकडे सोन्याच्या रिकव्हरी ऐवजी ७०,०००/– रुपये लाचेची मागणी करुन ती स्वीकारण्याची तयारी दर्शविली. सदर बाबत आरोपी लोकसेवक भाऊसाहेब गोविंद काळे यांचेविरुध्द भिंगार कॅम्प पोलीस स्टेशन येथे भ्रष्टाचार प्रतिबंध अधिनियम सन १९८८ चे कलम ७ प्रमाणे गुन्हा दाखल करण्यात आला आहे. |

लाचलुचपत प्रतिबंधक विभागातर्फे नागरीकांना आवाहन करण्यात येते की, भ्रष्टाचारासंबंधी काही माहिती असल्यास अगर लाच मागण्या–या लोकसेवकाबद्दल तक्रार असल्यास लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, महाराष्ट्र राज्य यांच्याशी संपर्क करावा.

संपर्क पत्ता :– लाचलुचपत प्रतिबंधक विभाग कार्यालय, जिल्हा मध्यवर्ती प्रशासकिय इमारत,
टि.व्ही. सेंटरसमोर, सावेडी, अहिल्यानगर

संकेतस्थळ :– acbmaharashtra.gov.in

ई–मेल :– acbwebmail@mahapolice.gov.in

ऑनलाईन तक्रार
अॅप्लीकेशन :– acbmaharashtra.net

टोल फ्री क्रमांक :– १०६४

दुरध्वनी क्रमांक :– ०२४१–२४२३६७७

व्हॉटस अप क्रमांक :– ९९३०९९७७००

(राजु आल्हाट)
पोलीस निरीक्षक,
अॅन्टी करप्शन ब्युरो, अहिल्यानगर